| MHTH070033372025 | दाखल दिनांक | १२/०८/२०२५ |
|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | १४/०८/२०२५ |
| | निकाल दिनांक | ०५/०८/२०२६ |
| | कालावधी | वर्षे महिने दिवस<br>०० ११ २४ |

**<u>२रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कल्याण यांचे न्यायालयात</u>**
**<u>तालुका–कल्याण, जिल्हा –ठाणे</u>**
(पीठासीन अधिकारी एन. के. जोशी)

विवाह याचिका क्र. १४२०/२०२५
निशाणी क्रमांक ९

रितु सुमितकुमार गोरानी,
लग्नापुर्वीचे नाव – रितु दीपक पाहुजा,
वय : २५ वर्षे, व्यवसाय – गृहिणी,
राहणार – आदि अम्मा हाईटस, पाचवा
मजला, फलॅट नं.५०१, फॉलोवर लेन,
अयप्पा मंदिरा समोर, उल्हासनगर,
जिल्हा – ठाणे–४२१००३. ... याचिकाकर्ते क्रमांक १

आणि

सुमितकुमार प्रकाशभाई गोरानी,
वय : २८ वर्षे, व्यवसाय – नोकरी,
राहणार – हरी ओम सोसायटी, महेश्वरी
हॉल मागे, घर नं.२९, पालनपुर,
गुजराथ – ३८५००१. ... याचिकाकर्ते क्रमांक २

---

हिंदु विवाह कायदा १९५५ चे कलम १३–ब अन्वये संमतीने घटस्फोट मिळणेसाठी याचिका.

---

याचिकाकर्ते क्र.१ तर्फे विधिज्ञ – एच. ए. मुलचंदानी
याचिकाकर्ते क्र.२ तर्फे विधिज्ञ – बी. सी. दादलानी

**<u>: न्यायनिर्णय :</u>**
(जाहीर दिनांक ५ ऑगस्ट, २०२६)

**१.** याचिकाकर्ते क्र.१ व २ हयांनी दाखल केलेली सदरची याचिका हिंदु विवाह कायदा १९५५ चे कलम १३–ब अन्वये संमतीने विवाह विच्छेदन होउन मिळण्यासाठी चालविण्यात आली.

**२.** याचिकाकर्ते क्र.१ व २ यांचे कथन असे की, त्यांचा विवाह दिनांक १५/०७/२०२४ रोजी हिंदु धर्माच्या रितीरिवाजानुसार संपन्न झाला. याचिकाकर्ते हयांना सदर लग्नसंबंधातुन एकही अपत्य नाही. विवाहानंतर याचिकाकर्ते हयांच्यात मतभेद होऊ लागले परिणामत: याचिकाकर्ते क्र.१ व २ हे

०२/०८/२०२४ पासून विभक्त रहात आहेत. याचिकाकर्ते क्र.१ व २ हयांच्या विचारांत तफावत असल्याने भविष्यात त्यांना एकत्र राहणे अशक्य झाले आहे. उभयंतांमधील मतभेद दूर करण्यासाठी अनेक प्रयत्न करण्यात आले. परंतु सर्व प्रयत्न निष्फळ झाले. सबब, याचिकाकर्ते यांनी प्रस्तूतची याचिका दाखल केली आहे.

**३.** दोन्ही याचिकाकर्ते यांना विवाह वाचविण्यासाठी व आपआपसातील मतभेद विसरून एकत्र राहण्याबाबतच्या सुचना देवून घटस्फोटाच्या मुद्दयावर फेरविचार करण्याच्या सुचना हिंदू विवाह कायदा कलम २३(२) अनुसार करण्यात आल्या व तडजोडीने प्रयत्न करण्याची समज देण्यात येउन प्रथम प्रस्ताव पारीत करण्यात आला. मध्यस्थी अहवाल नि.क्र.५ अन्वये दाखल केलेला आहे. याचिकाकर्ते क्र.१ हयांनी निशाणी क्रमांक ६ वर तसेच याचिकाकर्ते क्र.२ हयांनी निशाणी क्रमांक ७ वर त्यांच्या पुराव्याची शपथपत्रे दाखल केली. त्यात त्यांनी नमूद केले आहे की, त्यांच्या विचारांत तफावत असल्याने विवाहानंतर त्यांच्यामध्ये मतभेद होऊ लागले व भविष्यात एकत्र राहणे त्यांना अशक्य आहे. त्यांनी पुढे असे कथन केले की, त्यांच्यात समजोता घडवून आणण्याचे प्रयत्न करण्यात आले परंतु त्यात यश आले नाही म्हणून त्यांनी समजोत्याने व एकमेकांच्या संमतीने घटस्फोट घेण्याचे ठरविले आहे. अर्जातील कथनाच्या सत्यतेसाठी याचिकाकर्ते हयांनी त्यांचे आधारकार्ड, त्यांची लग्नपत्रीका, त्यांच्या लग्नातील फोटो असा कागदोपत्री पुरावा दाखल केला करुन निशाणी ८ वर पुरावा बंद पुरशीस दाखल केली आहे.

**४.** सदरची याचिका याचिकाकर्ते हयांनी त्यांना परस्पर संमतीने विवाह विच्छेदन होउन मिळण्याकरीता दाखल केलेली आहे. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची बळजबरी, अट व गैरवाजवी दडपण असल्याचे दिसून येत नाही. ही याचिका नामंजूर करण्यास कोणतेही सबळ कारण दिसून येत नाही. याचिकाकर्ते पती–पत्नी म्हणून भविष्यात एकत्र राहू शकत नाही म्हणून सदर याचिका मंजूर करून खालील आदेश पारीत करीत आहे.

**: आदेश :**

| | |
|---|---|
| १. | याचिका मंजुर करण्यात येत आहे. |
| २. | याचिकाकर्ते क्र.१ व २ हयांचा दिनांक १५/०७/२०२४ रोजी झालेला विवाह, हिंदू विवाह कायदा,१९५५ चे कलम १३–ब नुसार परस्पर संमतीने प्रस्तुत न्यायनिर्णयाच्या दिनांकापासून विच्छेदित करण्यात येतो. |
| ३. | येणे प्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा. |

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.

NITIN KASHINATH JOSHI
Digitally signed by NITIN KASHINATH JOSHI
Date: 2026.08.05 17:53:00 +1100

(एन.के. जोशी)
२रे सह दिवाणी न्यायाधीश
वरिष्ठ स्तर, कल्याण

कल्याण
दिनांक : ०५/०८/२०२६